जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
**Address** – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune
Maharashtra – 411001
**E-Mail ID :** crimepress.pune@gov.in **Ph.**020 / 26122478

पुणे पोलीस
Pune Police

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

# दैनंदिन गुन्हयांची प्रेसनोट

## पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर
## प्रेस नोट दि.२१/०५/२०२३
## दि.२०/०५/२०२३ रोजी रात्रौ ००/०० वा.ते २४/०० वा.पर्यंतचे दाखल गुन्हे

### भाग-१ ते ५ चे गुन्हे

१

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | सिंहगड पो स्टे २१५/२०२३,भादविक ३०२,३४ |
| **फिर्यादी** | अनिस शेख,वय-२९ वर्षे,रा.मानाजीनगर,नऱ्हे,पुणे |
| **आरोपीत** | एक इसम व त्याचे एक साथीदार तसेच इतर महिला (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.१७/०५/२०२३ रोजी २३/०० वा.औदुबर हाईटस,कृष्णाई नगर,नऱ्हे रोड,नऱ्हे,पुणे येथे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी यांना त्यांचे ओळखीचे नमुद इसमाने फोन करुन,सदर ठिकाणी बोलवुन घेवुन,फिर्यादी यांचा भाऊ रईस शेख व त्यांचेमध्ये झालेल्या वादा-विवादाचे कारणावरुन,नमुद ठिकाणी उपस्थीत असणारे नमुद इसमाचे नातेवाईक यांनी संगनमत करून,फिर्यादी व रईस आमीन शेख,वय-३१ वर्षे,व्यवसाय-रिक्षा चालक,रा.फलॅट नं.३०४,सिंग हाईटस,मानाजीनगर,नऱ्हे,पुणे यांना हाताने तसेच काठीने मारहाण करुन रईस यास जमिनीवर पाडुन,त्याचा गळा आवळण्याचा प्रयत्न केल्यामुळे,सदर झालेल्या बेदम मारहाणीत रईस शेख याचा ससुन हॉस्पीटल येथे उपचारा दरम्यान मृत्यु झाला आहे. |
| **त.अंमलदार** | सहा.पोलीस निरीक्षक, प्रविण जाधव ८७८८८३१६३० |

२

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | स्वारगेट पो स्टे १३४/२०२३,भादविक ३२४,३२३,५०४,३४,भारतीय हत्यार कायदा कलम ४(२५),महाराष्ट्र पोलीस अधिनियम कलम ३७(१)१३५ |
| **फिर्यादी** | मंदार गायकवाड,वय ३५ वर्ष,रा.महर्षीनगर,पुणे |
| **आरोपीत** | एक इसम व त्याचे इतर तीन साथीदार (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.१८/०५/२०२३ रोजी राञौ १०/३० वा.राधाकृष्ण मंदिरा जवळ महर्षीनगर,पुणे येथे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी हे त्यांचे मित्र १.रोहन सतीश काकडे,वय-२८ वर्ष २.आशिष बडदे यांचेसह आय.पी.एल.ची क्रिकेट मॅंच मोबाईलवर बघत असताना,काही दिवसांपुर्वी यातील नमुद इसमासोबत झालेल्या जुन्या भांडणाचा राग मनात धरुन,आपसात संगनमत करून,त्याने त्याचे इतर साथीदार यांचेसह फिर्यादी यांचे जवळ येवुन,त्यांना शिवीगाळ करुन,त्यांचे उजव्या हातावर कोयत्याने वार करून जखमी केले. तसेच रोहन काकडे यासही लाथा-बुक्यांनी मारहाण करून,बाजुला पडलेला बांबु घेवुन,त्याचे डाव्या पायावर,डाव्या अंगठयावर मारून,कोयत्याने त्याचे पाठीवर वार करून त्यास जखमी केले जखमी केले आहे. (फिर्यादी यांनी उपचार करून आल्यावर आजरोजी तक्रार दिली आहे.) |
| **त.अंमलदार** | सहा.पोलीस निरीक्षक, उमेश कारके ९७६७७१८०९९ |

३

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | चतु:श्रृंगी पो स्टे ३३६/२०२३,भादविक ४५४,३८० |
| **फिर्यादी** | अक्षय देशपांडे,वय ३३ वर्षे,रा.बाणेर,पुणे |
| **आरोपीत** | अज्ञात |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.२८/०४/२०२३ रोजी सकाळी ०९/०० वा. ते १९/०० वा.चे दरम्यान गगणगिरी निवास,दुसरा मजला,रुम नं.१,बाणेर,पुणे येथे |

| | |
|---|---|
| **तपशिल** | यातील फिर्यादी यांचे राहते घराचा दरवाजा,कोणीतरी अज्ञात इसमाने,कशाचेतरी सहाय्याने उघडुन,त्यावाटे आत प्रवेश करून,घरातील सामान अस्ताव्यस्त करून,कापडी पिशवीतील सोन्याचे दागीने व २०,०००/- रूपये रोख रक्कम असा एकुण २,१६,,०००/- रूपये किमतीचा ऐवज दिवसा घरफोडी चोरी करून नेला. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी. रुपेश टेमगिरे ९९२१०१२७८३ |

४

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | हडपसर पो स्टे १५७/२०२३,भादविक ३०६,३२३ |
| **फिर्यादी** | सारिका खरात,वय-३० वर्षे,रा.सिद्धार्थनगर,ता.टेंभुर्णी,जि.सोलापुर |
| **आरोपीत** | मयताचा पती (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.१७/०५/२०२३ रोजी सकाळी ०९/३० वा.चे पुर्वी सर्वे नं.१५/२,महात्मा फुले शाळेच्या ग्राऊंड समोर गोधळेनगर,हडपसर,पुणे येथे |
| **तपशिल** | यातील नमुद इसमाने त्याची पत्नी अनिता नागनाथ हिवराळे,वय-५९ वर्षे,रा.सर्वे नं.१५/२,महात्मा फुले शाळेच्या ग्राऊंड समोर गोधळेनगर,हडपसर,पुण हिचे चारीत्र्यावर संशय घेवुन,तीस सतत मारहाण करुन तीचा शारिरीक व मानसिक छळ करून,अनिता हिस तीचे राहते घरी गळफास घेवुन,आत्महत्या करण्यास प्रवृत्त केले. (फिर्यादी हया त्यांचे आईचा अंत्यविधी करुन,नातेवाईकाशी चर्चा करुन,आजरोजी तक्रार दिली आहे.) |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी. सुवर्णा गोसावी ७२७६२९२१०६ |

५

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | चंदननगर पो स्टे २१७/२०२३,भादविक २७९,३०४(अ),३३८,४२७,मोव्हेॲक्ट १३२(१)(क),११९/१७७ |
| **फिर्यादी** | प्रदिप घुगे,वय-१९ वर्षे,रा.वाघोली,पुणे |
| **आरोपीत** | महानगर पालिका कचरा उचलण्याचे ट्रकवरील अज्ञात चालक (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.१८/०५/२०२३ रोजी दुपारी १४/१० वा.युवॉन फ्रंट रोड,बालाजी स्वीट दुकाना समोरचे कॉर्नरला, भुलाजी पठारेनगर,खराडी,पुणे येथे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी यांचा आतेभाऊ अशोक नवनाथ दराडे,वय-२५ वर्षे हा त्याचे मोटार सायकलवरुन युवॉन फ्रंट रोडने वाघोली,पुणेकडे जात असताना,त्याचे पाठीमागुन येणारा महानगर पालिका कचरा उचलण्याचे यातील नमुद ट्रकवरील अज्ञात चालकाने,त्याचे ताब्यातील ट्रक हा वाहतुकीचे नियमांकडे दुर्लक्ष करून, हयगयीने,अविचाराने व भरधाव वेगात चालवुन,नमुद ठिकाणी मोटार सायकलस्वार अशोक दराडे यांस जबर ठोस मारून,गंभीर जखमी करून,त्याचे मृत्युस कारणीभुत होवुन,मोटार सायकलचे नुकसान करून, अपघाताचे ठिकाणी न थांबता, अपघाताची खबर न देता पळुन गेला. (फिर्यादी हे आज रोजी तक्रार देण्यास आल्याने,वरीलप्रमाणे गुन्हा नोंद करण्यात आला आहे.) |
| **त.अंमलदार** | सहा.पोलीस निरीक्षक, खांडेकर ९५२९७९६००६ |

६

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | सिंहगड पो स्टे २१७/२०२३,भादविक ३७९ |
| **फिर्यादी** | एक महिला,वय-५८ वर्षे,रा.माणिकबाग,सिंहगड रोड,पुणे |
| **आरोपीत** | अज्ञात (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.१९/०५/२०२३ रोजी ०४/०० वा.ते ०५/०० वा.चे दरम्यान दांडेकर पुल ते माणिकबाग तसेच स्वारगेट ते मारुती मंदिर धायरीगांव पर्यंत जाणाऱ्या पीएमपीएलच्या बस मध्ये |
| **तपशिल** | यातील फिर्यादी हया दांडेकर पुल ते माणिकबाग तसेच स्वारगेट ते मारुती मंदिर धायरीगांव पर्यंत जाणाऱ्या पीएमपीएलच्या बस मधुन प्रवास करीत असताना,कोणीतरी अज्ञात इसमाने,बस मधील गर्दिचा फायदा घेवुन,फिर्यादी यांचे हातातील सोन्याची बांगडी / पाटली ५२,५००/- रुपये किंमतीची नकळत काढुन चोरी करून नेली आहे. |
| **त.अंमलदार** | पोलीस अंमलदार, यशवंत गोलांडे ९१३०००३६२१ |

**जनसंपर्क अधिकारी,**
**पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर**